ePaper
शिंदेंच्या शिवसेनेत भाकरी फिरणार, लवकरच मोठे उलटफेर?
| वर्ष - 8 | अंक - 336 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™


## आतील पानांत
- जडेजा- सिराजची झुंज अपयशी!
- कुणाच्या डोक्यावर पराभवाचं खापर?
- युक्रेनबरोबरचं युद्ध थांबवलं नाही तर!
- पत्नीने केली पतीची 'दृश्यम' स्टाईल हत्या


www.mahaenews.com | मंगळवार, दि. 15 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज ठाकरेंच्या मनात नेमके काय ? ठाकरे बंधूंच्या मनोमीलनाबाबत चकार शब्दही नाही!

# राजनी दिले उद्धवना टेन्शन!

## इगतपुरीतील शिबिरात सांगून टाकले, 'मराठीच्या मुद्द्यावर आम्ही एकत्र आलो, राजकारणासाठी नाही !

| इगतपुरी | प्रतिनिधी | महाईन्यूज

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तीन दिवसांचे शिबिर इगतपुरी येथे सुरू झाले आणि मनसेचे नेते राज ठाकरे यांनी पहिल्याच दिवशी उद्धव ठाकरे यांना भरपूर टेन्शन दिले आहे. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी ठाकरे बंधूंच्या मनोमीलनाबद्दल चकार शब्दही काढला नाही.**

### तमाम राजकारण्यांचे लक्ष..

ठाकरे बंधूंच्या दोन्ही पक्षांचे मनोमीलन होऊन पुढील निवडणुकांमध्ये 'ठाकरे पॅटर्न' यशस्वी होईल, असे सांगणाऱ्यांना चांगलीच चपराक बसली आहे. उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे यांच्या टाळीसाठी हात पुढे केला असला तरी अद्याप टाळी मिळालेली नाही, त्यामुळे उद्धव ठाकरे यांचे आणि त्यांच्या शिवसेना गटाचे टेन्शन चांगलेच वाढले आहे.

### राज ठाकरेंच्या मनात काय ?

हिंदी सक्तीच्या विरोधात ठाकरे बंधू एकत्र आले होते आणि त्यांनी कडाडून विरोध केला. त्यानंतर महायुती सरकारने हिंदीच्या सक्तीचे दोन जीआर रद्द केल्यामुळे ठाकरे बंधूंनी मोठ्या प्रमाणावर विजयी मेळावा घेतला, त्यावेळची सर्वांची वक्तव्ये पाहून त्यांचे मनोमीलन होणार, हे निश्चित समजले जात होते. पण, सध्या तरी या वृत्ताला सुरुंग लागला आहे.

### शिबिरात काय वक्तव्ये?

विजयी मेळाव्यानंतर 'ठाकरे पॅटर्न' एकदम चर्चेत आला आणि एकत्र निवडणुका लढवल्यास त्याचा महाराष्ट्रात तसेच मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत चांगलाच फायदा होईल, असे सर्वांनी मत व्यक्त केले. याला पार्श्वभूमी होती ती म्हणजे, शिवसेना-ठाकरे गट आणि मनसे यांच्या 'युती' ची जोरदार चर्चा! या पार्श्वभूमीवर आता मनसेच्या शिबिरातून महत्त्वाची बातमी समोर आली आहे.

### आंदोलन मनसेचे, उद्धव सामील

राज्यात हिंदीच्या मुद्द्यावरून वातावरण चांगलेच तापले होते, पहिली पासून हिंदींची सक्ती नको, अशी उघड भूमिका मनसेची होती. मनसेने आपल्या मागणीसाठी मोठे आंदोलन उभारले, त्यानंतर या आंदोलनात शिवसेना ठाकरे गटाने देखील उडी घेतली. अखेर राज्य सरकारने त्रिभाषा सूत्राबाबत काढलेले दोन्ही जीआर रद्द केले. त्याचप्रमाणे, त्रिभाषा सूत्राचा अभ्यास करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली.



### विजयी मेळाव्याचे आयोजन..

दरम्यान, त्रिभाषा सूत्राचा जीआर रद्द केल्यानंतर मुंबईत विजयी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला उद्धव आणि राज ठाकरे बंधू उपस्थित होते आणि त्यांनी मार्गदर्शनही केले. या मेळाव्यानंतर पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची युती होणार असल्याच्या चर्चेने जोर धरला. मात्र, राज ठाकरे यांच्या पक्षांकडून अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे ते काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष होते.

### चर्चा बाळा नांदगावकर यांच्या वक्तव्याची!

उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी मनसेच्या भूमिकेबद्दल प्रश्न उपस्थित केला होता. त्यांची भूमिका काय हे संपूर्ण महाराष्ट्राला आत्ताच सांगण्याची गरज आहे, असे संजय राऊत म्हणाले होते. त्यावर उत्तर देताना मनसेचे प्रवक्ते बाळा नांदगावकर यांनी त्या वक्तव्याला बगल दिली होती. मनसे पक्षाने यापूर्वी स्वबळावर निवडणुका लढवल्या आहेत, त्याची आम्हाला सवय आहे, असा एक टोला मारून त्यांनी राज ठाकरे यांची भूमिका स्पष्ट केली की काय, असे म्हणायला आता हरकत नाही !

### मनसेच्या शिबिरात

### विचारमंथन..

त्यातच आता सोमवारपासून इगतपुरी येथे मनसेचे शिबिर सुरू झाले आहे. या शिबिरात मोठ्या प्रमाणावर विचारमंथन होण्याची शक्यता वर्तवली जात होते. मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठी पुरताच होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे राज ठाकरे यांनी उद्गार काढल्यामुळे उद्धव यांच्या पक्षाचे टेन्शन चांगलेच वाढले असून पुढे काय होणार याची चर्चा सुरू झाली आहे. नोव्हेंबर – डिसेंबरदरम्यान चित्र पाहूनच 'युती' चा निर्णय घेऊ, असे राज ठाकरे यांनी पत्रकारांशी अनौपचारिक गप्पांदरम्यान म्हटले आहे.

### राज यांचा सावध पवित्रा

राज ठाकरे यांनी इगतपुरीमध्ये युतीबाबत मोठे वक्तव्य केले असून त्याचीच सर्वत्र जोरदार चर्चा आहे. युतीबाबत शिवसेना ठाकरे गटाने टाळी दिलेली असताना दुसरीकडे मात्र मनसे सावध पवित्रा घेत असल्याचे दिसून येत आहे. राज ठाकरेंच्या विधानानंतर ठाकरे बंधूंच्या युतीचा 'सस्पेन्स' आता आणखी वाढला आहे.

### राज यांचा 3 दिवस मुक्काम

मनसेने नेते आणि पदाधिकाऱ्यांसाठी शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराच्या माध्यमातून राज ठाकरे हे मनसेच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. हे शिबिर तीन दिवसांचे असून तीनही दिवस राज ठाकरे यांचा मुक्काम इगतपुरी येथे असणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या शिबिराला महत्त्व प्राप्त झाले आहे.

# पुणे-दिल्ली विमानात उड्डाणादरम्यान बिघाड!

## धावपट्टीवरून विमान माघारी; नऊ तास विलंबाने उड्डाण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरून दिल्लीकडे जाणाऱ्या एका खासगी कंपनीच्या विमानात तांत्रिक बिघाड असल्याचे दिसताच वैमानिकाने प्रसंगावधान दाखवून धावपट्टीवरूनच विमान माघारी वळविल्याची घटना रविवारी घडली. तांत्रिक दुरुस्ती केल्यानंतर रात्री नऊ वाजून पाच मिनिटांनी या विमानाने दिल्लीच्या दिशेने उड्डाण केले.**




विमानतळावरून दुपारी १२ वाजता दिल्लीला जाणाऱ्या एका खासगी कंपनीच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे विमान कंपनीच्या प्रतिनिधींकडून तांत्रिक दुरुस्तीचे कारण देऊन सायंकाळी पाच वाजून १५ मिनिटांनी विमानाचे उड्डाण होणार असल्याचे प्रवाशांना सांगण्यात आले. त्यामुळे प्रवाशांना पाच तास विमानतळावरच प्रतीक्षा करावी लागली.वेळापत्रकानुसार प्रवासी विमानात बसल्यानंतर दिल्लीच्या दिशेने जाण्यासाठी सज्ज झाले. पाच वाजून १५ मिनिटांनी विमान धावपट्टीवर आले. इंजिन सुरू असताना वैमानिकाला पुन्हा तांत्रिक बिघाड असल्याचे जाणवले. त्यामुळे वैमानिकाने धावपट्टीवरील विमान माघारी वळवून प्रवाशांना विमानातून उतरण्याची विनंती केली.अगोदरच पाच तास विलंब झाला असताना पुन्हा तांत्रिक बिघाड असल्याचे सांगण्यात आल्याने विमानातील प्रवासी दिशा श्रॉफ यांनी समाजमाध्यमावरून या घटनेची माहिती दिली. त्यानुसार 'गेल्या पाच तासांपासून आम्ही विमानात बसून आहोत. त्यामुळे प्रवास रद्द करून माझे साहित्य, पिशव्या परत द्याव्या,' अशी मागणी केली.तांत्रिक बिघाडामुळे दुपारी ५.१५ मिनिटांनी विमान दिल्लीकडे जाण्यासाठी सज्ज होते. मात्र, तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विमान धावपट्टीवरून पुन्हा मूळ जागेवर आणावे लागले. मात्र, प्रवाशांना दोन तास विमानात बसवले गेले, ही माहिती चुकीची आहे. एक तासाने प्रवाशांना खाली उतरवले गेले. दुपारी १२ वाजता विमानाचे उड्डाण होऊ शकणार नाही, सहा तास विलंब होणार आहे, याची कल्पना अगोदरच प्रवाशांना देण्यात आली होती. प्रवाशांना नाश्ता देण्यात आला,' असे स्पष्टीकरण विमान कंपनीकडून देण्यात आले. विमानतळावरून दुपारी १२ वाजता दिल्लीला जाणाऱ्या एका खासगी कंपनीच्या विमानात तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे विमान कंपनीच्या प्रतिनिधींकडून तांत्रिक दुरुस्तीचे कारण देऊन सायंकाळी पाच वाजून १५ मिनिटांनी विमानाचे उड्डाण होणार असल्याचे प्रवाशांना सांगण्यात आले. त्यामुळे प्रवाशांना पाच तास विमानतळावरच प्रतीक्षा करावी लागली.वेळापत्रकानुसार प्रवासी विमानात बसल्यानंतर दिल्लीच्या दिशेने जाण्यासाठी सज्ज झाले. पाच वाजून १५ मिनिटांनी विमान धावपट्टीवर आले. इंजिन सुरू असताना वैमानिकाला पुन्हा तांत्रिक बिघाड असल्याचे जाणवले. त्यामुळे वैमानिकाने धावपट्टीवरील विमान माघारी वळवून प्रवाशांना विमानातून उतरण्याची विनंती केली.

### कंपनीकडून स्पष्टीकरण

अगोदरच पाच तास विलंब झाला असताना पुन्हा तांत्रिक बिघाड असल्याचे सांगण्यात आल्याने विमानातील प्रवासी दिशा श्रॉफ यांनी समाजमाध्यमावरून या घटनेची माहिती दिली. त्यानुसार 'गेल्या पाच तासांपासून आम्ही विमानात बसून आहोत. त्यामुळे प्रवास रद्द करून माझे साहित्य, पिशव्या परत द्याव्या,' अशी मागणी केली.तांत्रिक बिघाडामुळे दुपारी ५.१५ मिनिटांनी विमान दिल्लीकडे जाण्यासाठी सज्ज होते. मात्र, तांत्रिक बिघाड झाल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने विमान धावपट्टीवरून पुन्हा मूळ जागेवर आणावे लागले. मात्र, प्रवाशांना दोन तास विमानात बसवले गेले, ही माहिती चुकीची आहे. एक तासाने प्रवाशांना खाली उतरवले गेले. दुपारी १२ वाजता विमानाचे उड्डाण होऊ शकणार नाही.

# पालिकेतील वाढीव दराच्या निविदा रद्द

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांची विधानसभेत माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित निविदा प्रक्रिया पाच ते सात टक्के जास्त दराने आल्याने संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही,' अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.**




घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे आमदार भाजपचे भीमराव तापकीर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार बापूसाहेब पठारे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मिसाळ यांनी ही माहिती दिली.राज्य शासनाने महानगरपालिकेला या निविदा प्रक्रियेची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया रद्द केली आहे. या निविदा प्रक्रियेमुळे महानगरपालिकेला कोणतेही थेट आर्थिक नुकसान झालेले नाही. मात्र, निविदा प्रक्रियेदरम्यान झालेला प्रशासकीय खर्च कोणाकडून वसूल करायचा याबाबत महापालिकेला निर्देश दिले जातील.तसेच लोकप्रतिनिधींना विशिष्ट निविदांबाबत काही शंका असल्यास किंवा कुठल्या निविदांची सखोल चौकशी आवश्यक आहे, असे वाटत असल्यास त्यांनी संबंधित माहिती देण्याचे आवाहनही मिसाळ यांनी यावेळी केले. संबंधित प्रकरणांमध्ये चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. महापालिकेच्या घनकचरा व्यवसथापनाच्या कामासाठी राबविण्यात आलेल्या निविदेमध्ये १५८ कोटी ४४ लाख रुपये निश्चित करण्यात आले होते. कामाचे स्वरूप, क्षेत्रफळ आणि कामागारांची संख्या सारखीच असातनाही ही रक्कम गेल्या वर्षीपेक्षा ७० ते ८० लाखांनी जास्त असल्याने महापालिकेचे दहा कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्यासंदर्भातील मुद्दा विधानसभेत आमदार तापकीर यांनी उपस्थित केला होता. तसेच, निविदेच्या अटीनुसार ठेकेदाराने स्वत:ची किंवा भाडेकराराने वाहने वापरून कचरा उचलणे अपेक्षित असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी तपशील आणि क्रमांक जाणीपूर्वक मागविले नाहीत.त्यामुळे ५० कामगारांची आवश्यकता असातना दोनशे ते अडीचशे कामगार दाखविण्यात आले होते. त्यांचा कामगार कल्याण निधी, भविष्य निर्वाह निधी तसेच राज्य विमा योजनेत गैरव्यवार करून विशिष्ट ठेकेदारांना फायदा होईल, अशा अटी निश्चित करण्यात आल्या होत्या.

### संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द

केंद्रीय दक्षता आयोगाच्या नव्या तत्त्वांचा दाखला देण्यात आला होता. तसेच काळ्या यादीतील कंपनीला निविदा मंजूर करण्यात आल्याची बाब तापकीर यांनी उपस्थित केला होता.'पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित निविदा प्रक्रिया पाच ते सात टक्के जास्त दराने आल्याने संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची सभागृहाचे लक्ष वेधले

# उद्योग क्षेत्रातून टॅक्स घेता, मग सुविधा का देत नाही?

## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे एकत्रित बैठक घेण्याचे निर्देश

। मुंबई/पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड औद्योगिक क्षेत्रात पायाभूत सोयी-सुविधांबाबत राज्य सरकार सर्व संबंधित विभागांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनामध्ये बैठक घेईल. औद्योगिक क्षेत्रातील वीज, रस्ते, ड्रेनेज, सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापन याबाबत कालबद्ध नियोजन करण्यात येईल, असे आश्वासन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.**




पिंपरी-चिंचवड शहरातील औद्योगिक क्षेत्राला रस्ते, वीज, ड्रेनेज, सांडपाणी व कचरा व्यवस्थापन याबाबत समस्यांचा सामना करावा लागतो. एमआयडीसी आणि महापालिका यांच्यातील अधिकारक्षेत्राच्या विसंवादामुळे हा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने राज्य सरकारचे लक्ष वेधले. त्याला राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सकारात्मक उत्तर दिले.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड शहराची ओळख 'मिनी इंडिया' अशी आहे. उद्योग व्यावसायाच्या निमित्ताने आमच्या शहरात देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक वास्तव्य करतात. शहरात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औद्योगिक कंपन्या आणि लघु उद्योग आहेत. महानगरपालिकेला औद्योगिक क्षेत्रातून मालमत्ताकरापोटी 3 हजार 470 औद्योगिक कंपन्यांमधून  प्रतिवर्ष सुमारे 320 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. पण, महापालिका सक्षमपणे पायाभूत सोयी-सुविधा पुरवत नाही. आमच्या अधिकार क्षेत्रात येत नाही, असे उत्तर दिले जाते.

'एमआयडीसी'च्या आराखड्यात ड्रेनेज, सांडपाणी व्यवस्थापनाचा आराखडा नाही. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्याप कार्यान्वयीत झालेला नाही. वीज समस्या मोठ्या प्रमाणात आहे. रस्ते आणि सुविधांबाबत उद्योजकांनी चाकणमध्ये बैठक घेतली. मोठ्या प्रमाणात चाकणमध्ये गुंतवणूक होते आहे. पण, सुविधा त्या प्रमाणात सक्षम केल्या पाहिजेत. त्यासाठी महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी, महावितरण, प्रदूषण नियंत्रण मंडळ अशा सर्व संबंधित विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

> 'एमआयडीसी'मध्ये ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी या परिसराचा अमृत योजनेत समावेश केला आहे, अशी माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सभागृहात दिली. रस्ते, वीज, ड्रेनेज, सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत महापालिका, पीएमआरडीए, एमआयडीसी अशा सर्व विभागांची बैठक घेण्यात येणार आहे. यावर सकारात्मक कार्यवाही होईल, असा विश्वास आहे. औद्योगिक पट्ट्यातील पायाभूत सोयी-सुविधा जबाबदारी निश्चित करणे आणि निधी उपलब्ध करणे यासाठी आम्ही पाठपुरावा करणार आहोत.
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

---

## प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध

# हल्लेखोरांवर मोक्कांतर्गत कारवाईची राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारधारेवर कार्यरत असलेल्या संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष आणि महाराष्ट्रातील मराठा व बहुजन समाजासाठी लढणारे प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा राष्ट्रवादी युवक काँग्रेस, मराठा सेवा संघ, छावा संघटना, मराठा क्रांती मोर्चा आणि इतर पुरोगामी संघटनांच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.**





पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमून निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली. विशेषतः हल्लेखोर भाजप युवा मोर्चाचे पदाधिकारी दीपक काटेवर मोक्का (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम) अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी ठाम भूमिका आंदोलकांनी घेतली. युवक शहराध्यक्ष इमरान शेख म्हणाले, "प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेला हा हल्ला केवळ एखाद्या व्यक्तीवर नाही, तर महाराष्ट्रातील संपूर्ण पुरोगामी विचारसरणीवर झालेला आहे. भाजपा संघटनेतील गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तींना पाठीशी घालून असे हल्ले घडवले जात आहेत. हल्लेखोर दीपक काटेवर आधीपासूनच अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. भाजपा प्रत्येक जिल्ह्यात एक नवीन वाल्मीक कराड घडवण्याचा प्रयत्न करते आहे का, असा संतप्त सवालही त्यांनी उपस्थित केला." या आंदोलनात ज्येष्ठ समाजसेवक मारुती भापकर यांनी हल्ल्याला पूर्वनियोजित कट कारस्थान म्हटले. "राज्य सरकारच्या उच्च पातळीवरूनच अशा पुरोगामी नेतृत्वावर हल्ल्यांचे षड्यंत्र रचले जात आहे का?" असा थेट सवाल त्यांनी केला.

### राज्य सरकारला इशारा...

छावा संघटनेचे धनाजी येळकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे देवेंद्र तायडे, अरुण पवार, मराठा सेवा संघाचे जाधव सर, प्रियंका ताई बारसे, काँग्रेसचे नरेंद्र बनसोडे आदी मान्यवरांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. सर्व वक्त्यांनी प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेला हल्ला हा केवळ व्यक्तीगत नसून विचारवंतांच्या विरोधातील कट असल्याचे स्पष्ट केले. या आंदोलनात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष इम्रान शेख, माजी नगरसेविका प्रियांका बारसे, देवेंद्र तायडे, धनाजी येळकर, सतीश काळे, सचिन निंबाळकर, नकुल भोईर, नरेंद्र बनसोडे, विशाल जाधव, साकी गायकवाड, ओम शिरसागर, प्रशांत जाधव, दानिश अन्सारी, गणेश देवराम, विकास कांबळे, अक्षय अरोडे, समाधान अचलखांब, तनवीर अहमद, समीर सय्यद यांच्यासह असंख्य कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते. आंदोलनकर्त्यांनी सरकारला इशारा दिला की, जर हल्लेखोरांवर कठोर कारवाई झाली नाही तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग »



### गुरू सांगेल तेच साधन

परमार्थ म्हणजे काय, हे मी तुम्हाला अगदी थोडक्यात सांगतो. परमार्थाचे जर काही मर्म असेल तर, आसक्ती सोडून प्रपंच करणे हे होय. ज्याने आपल्याला प्रपंच दिला त्याचाच तो आहे असे समजून वागले, म्हणजे आपल्याला त्याबाबत सुखदु:ख बाधत नाही. हे साधण्यासाठी गुरुमुखाने दिलेले परमात्म्याचे नाम आपण घेत असावे. गुरू कुणाला करावे ? जिथे आपले समाधान होते तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद कुठेही एकच असते. गुरूला कुठे आडनाव असते का ? गोंदवलेकर गोंदवल्यास राहत असतील; दुसरा कुणी आणखी कोणत्या गावी राहत असेल. म्हणून लौकिक आडनाव जरी निराळे झाले, तरी गुरुपद हे सर्वकाळी अबाधित असेच असते. तुमचे जिथे समाधान झाले त्याला गुरू समजा, आणि तो जे साधन सांगेल त्यातच त्याला पाहा; त्याच्या देहाकडे पाहू नका. तो लुळापांगळा आहे की काय, हे पाहू नका. तो देहाने कसाही असला, तरी त्याने सांगितलेल्या साधनात रहा. त्याची लाज, जिथून गुरुपद निर्माण झाले, त्याला असते. गुरुआज्ञा हाच परमार्थ; तो सांगेल तेच साधन. तुम्ही आपल्या मनाने काही ठरवून करू लागलात, तर त्यात तुम्हाला यश येणार नाही. अभिमान धरून काही करू लागलात, तर ते साधणार नाही. म्हणून अभिमान सोडून गुरूकडे जा. गुरू सांगेल तेच साधन हे पक्के लक्षात ठेवा.

खरा परमार्थ हा लोकांना उपदेश करण्यासाठी नाही, तो स्वत:करता आहे. आपला परमार्थ जगाला जितका कमी दिसेल, तितका आपल्याला फायदेशीर आहे. जगातल्या मोठेपणात मुळीच सार्थकता नाही. खरा मोठेपणा नसताना उगीच मोठेपणा वाटणे, हा तर फार मोठा घात आहे. एकाने कोळशाचे दुकान घातले आणि दुसऱ्याने पेढ्याचे दुकान घातले; दुकान कशाचेही असले, तरी शेवटी फायदा किती होतो, याला महत्त्व आहे. तसे, प्रपंचात कमी जास्त काय आहे याला परमार्थात महत्त्व नसून, मनुष्याची वृत्ती भगवंताकडे किती लागली याला महत्त्व आहे. परमार्थाला कोणतीही परिस्थिती चालते. आपली वृत्ती मात्र स्थिर असली पाहिजे. एकीकडून मनाचे संयमन आणि दुसरीकडून भक्तीचा जोर असला, म्हणजे परमार्थ लवकर साधतो. खरोखर, परमार्थ इतका सोपा आहे, की तो सहज रीतीने करता येतो. पण गंमत अशी, की तो सोपा आहे म्हणून कुणीच करीत नाही. प्रपंच हा परमार्थाच्या आडकाठीसाठी नाही, तो परमार्थासाठीच आहे, हे पक्के लक्षात ठेवावे. साधकाने देहाचे कर्तव्य प्रारब्धावर टाकून, मनाने मात्र ईश्वरोपासना करावी.

बोधवचन:- हृदयी ठेवा राम। मुखी सदा त्याचे नाम। हातात असावे प्रपंचाचे काम। हेच खरे परमार्थाचे मर्म॥

# ‘जनसुरक्षा’ हा तर मुखवटा.. ‘टार्गेट’ नक्षली का विरोधक?



**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**शहरी नक्षलवाद उखडून टाकण्यासाठी जनसुरक्षा कायदा आणला गेल्यामुळे आणीबाणी सदृश्य स्थिती झाली आहे, असा ठणाणा विरोधी पक्षांनी लावला असून त्यामुळे नेमके कोण सुपात आणि कोण जात्यात, हा प्रश्न निर्माण झाला आहे.**



### जुलै २०२४ मध्ये सादर झालेले विधेयक..

‘महायुती” सरकारने २०२४ मध्ये सादर केलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक हे शहरी नक्षलवाद आणि अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटनांविरोधात कारवाई करण्याच्या उद्देशाने आणले गेले. हे विधेयक मूळ स्वरूपात जुलै २०२४ मध्ये विधानसभेत सादर करण्यात आले होते, परंतु विरोधी पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या तीव्र विरोधामुळे ते मंजूर होऊ शकले नव्हते. त्यानंतर, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समितीने जनतेकडून सूचना आणि हरकती मागवून विधेयकात सुधारणा केल्या आणि पुन्हा ते मंजुरीसाठी ठेवण्यात आले.

### विधेयक आवाजी मतदानाने मंजूर!

विधानसभेत हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झाले. पण, विधेयक मंजुरीवेळी विरोधकांचा बदललेला सूर लक्षात घेऊन लोक अवाक् झाले असून विरोधक घाबरले की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकशाहीत विचारांची देवाणघेवाण झाल्यानंतर सर्वसहमती किंवा मतपरिवर्तन घडू शकते. मात्र, नाना पटोले, जयंत पाटील, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड अशा दिग्गजांचे मतपरिवर्तन कोण करू शकेल? असाही प्रश्न निर्माण होतो.

### प्रत्येक ठिकाणी विरोध नको..

उद्योगपती गौतम अदानी तसेच इतर उद्योगपतींना जमीन देताना अडथळे येऊ नयेत, मुंबई, कोकण, विदर्भ, मराठवाडा अशा सर्व भागातील भविष्यातील उद्योगांचे मार्ग मोकळे व्हावेत, म्हणून जनतेला जखडून ठेवण्यासाठी हा कायदा आणला आहे, भीमा कोरेगावनंतर विरोधी विचारांच्या लोकांना डांबण्यासाठी ही नवी पद्धत आहे या आणि अशा आरोपांमध्ये विरोधकांनी विधेयकालाच जखडले. त्याच मंडळींनी तो कायदा ज्या पद्धतीने संमत केला, ते पाहता केवळ डाव्या पक्षाचा एकमेव आमदार या विरोधात असावा, असे चित्र निर्माण झाले आहे.

### फडणवीस यांचे राजकीय कौशल्य..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हे ‘फ्लोअर मॅनेजमेंट’ म्हणावे की राजकारण कुशलता? केंद्राच्या आवाहनाप्रमाणे चार राज्यांनी त्यातही भाजप विरोधी विचाराच्या राज्यांनी कायदा केला असून त्यांच्यापेक्षा उजवा आणि कोणत्याही व्यक्तीला सहजासहजी हात लावता येणार नाही, कोणत्याही संघटनेवर बंदी घालण्यापूर्वी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसमोर समर्थन द्यावे लागेल आणि बंदी घातली तरी त्या निर्णयाला आव्हान देता येईल, इतका प्रागतिक कायदा आपण केला असल्याचे फडणवीस यांनी विरोधकांच्याही मनावर ठसवले, यातच काय ते आले !

### विरोधकांनी आवाज उठवला

विचार करण्यासारखी एक गोष्ट म्हणजे, नाना पटोले यांच्या पक्षातर्फे नितीन राऊत, विश्वजीत कदम, जयंत पाटील यांच्या पक्षातर्फे रोहित पवार आणि भास्कर जाधव यांच्या पक्षातर्फे वरुण सरदेसाई यांनी या विधेयकाच्या विरोधात भाषणे केली. विधेयकातील शहरी नक्षल, कट्टर डाव्या संघटना, नोंदणीकृत किंवा अनोंदणीकृत गट हे आणि इतर अनेक उल्लेख मोघम असल्याचा, ज्यामुळे सरकार ऐनवेळी कोणावरही कारवाई करू शकेल या गोष्टीकडे लक्ष वेधले.

### विरोध दिशाहीन आणि विखुरलेले..

दिग्गजांच्या पक्षातील कुरबुरी लक्षात घेता हे मुद्दे विरोधातील घटक पक्षांमधील कोण मांडले त्यालाही खूप महत्त्व आहे! त्यामुळे विरोधक आपसातही किती विखुरलेले आहेत त्याची ही चर्चा म्हणजे एक ज्वलंत उदाहरण ठरले! विरोधक आपल्या भूमिकेवर ठाम राहू शकले नाहीत, हेच सत्य यात

महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे अंतर्गत सुरक्षेच्या नावाखाली आणले गेले असले, तरी त्याच्या अस्पष्ट व्याख्या आणि व्यापक अधिकारांमुळे लोकशाही मूल्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुधारित विधेयकात काही स्पष्टता आणण्याचा प्रयत्न झाला असला, तरी ‘शहरी नक्षलवाद’ आणि ‘बेकायदेशीर कृत्य’ यांच्या व्याख्येचा अभाव हा चिंतेचा विषय आहे, हे मान्यच करावे लागेल!

### पारदर्शकता आणि जबाबदारी हवी !

विधानसभेत झालेल्या चर्चेतून हाती काहीच लागले नाही. या विधेयकाच्या अंमलबजावणीमुळे सामाजिक कार्यकर्ते, आंदोलनकर्ते आणि सामान्य नागरिकांचे स्वातंत्र्य धोक्यात येऊ शकते. यापूर्वीच्या कायद्यांचा इतिहास पाहता, या विधेयकाचा गैरवापर टाळण्यासाठी सरकारला पारदर्शकता आणि जबाबदारी दाखवावी लागेल. अन्यथा, हा कायदा लोकशाहीविरोधी साधन ठरू शकतो, ज्यामुळे सामाजिक असंतोष वाढेल आणि सरकारच्या विश्वासार्हतेला धक्का बसेल. मूळ विधेयकात शहरी नक्षलवादाला आळा घालण्याच्या नावाखाली सरकारला व्यापक अधिकार देण्याची तरतूद होती. यामध्ये कोणत्याही संघटनेला बेकायदेशीर’ ठरवणे, त्यांचे कार्यालय आणि संपत्ती जप्त करणे, बँक खाती गोठवणे आणि व्यक्तींना अटक करण्याचे अधिकार समाविष्ट होते.

### अनेक सुधारणा केल्या हे मान्य..

संयुक्त समितीने जनतेकडून दि. १ एप्रिल २०२५ पर्यंत सूचना मागवल्या आणि त्यानुसार विधेयकात काही सुधारणा केल्या. सुधारित विधेयकात बेकायदेशीर कृत्यांची व्याख्या स्पष्ट करण्याचा प्रयत्न झाला. तसेच, विधेयकात चार मुख्य अपराधांचा समावेश आहे. बेकायदेशीर संघटनेचे सदस्यत्व, निधी गोळा करणे, व्यवस्थापन करणे आणि त्यांच्या कृत्यांना सहाय्य करणे. या अपराधांसाठी दोन ते सात वर्षांचा कारावास आणि दोन ते पाच लाख रुपये दंडाची तरतूद आहे.

### अपराध हा गैरजामीन पात्र..

अपराध संज्ञेय आणि गैरजामीनपात्र ठेवण्यात आले आहेत. तथापि, सुधारित विधेयकातही ‘शहरी नक्षलवाद’ याची स्पष्ट व्याख्या नाही. सरकारचा दावा आहे की, हे विधेयक माओवादी आणि नक्षलवादी संघटनांवर लक्ष केंद्रित करते, जे शहरी भागात ‘सुरक्षित आश्रयस्थळे’ आणि शहरी अड्डे स्थापन करतात. मात्र, ‘कट्टर डाव्या संघटना’ याची व्याख्या अस्पष्ट आहे. यामुळे सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी संघटना, कामगार संघटना आणि मानवी हक्कांसाठी लढणाऱ्या गटांना लक्ष्य केले जाईल, अशी भीती आहे, हे मात्र नक्की !

### आदित्य ठाकरे यांचे म्हणणे..

आदित्य ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले की, हा कायदा जनतेच्या स्वातंत्र्यावर गदा आणेल. सभागृहाबाहेर सामाजिक कार्यकर्त्यांनी निदर्शने केली, तर काही कार्यकर्त्यांनी याला ‘नव्या आणीबाणीचा प्रयत्न’ संबोधले. तरीही, विधेयक आवाजी मतदानाने मंजूर झाले, ज्यामुळे सत्ताधारी महायुती सरकारच्या संख्याबळाचा प्रभाव दिसून आला, हे फडणवीस यांचे यश ! या विधेयकाचे प्रयोजन नेमके कोणासाठी याबाबत विरोधक गोंधळलेले आहेत. पण त्यांनी एक लक्षात ठेवावे की आज ते जात्यात असले तरी सुपात कोण आहे याकडे बारकाईने लक्ष ठेवावे आणि शहाला काटशह देण्याचे प्रयत्न करावेत..नाहीतर ‘महायुती’ सरकारने त्यांच्या हातात ठेवले तरी काय ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जनसुरक्षा कायद्याची प्रत्येक जिल्ह्यात होळी

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची माहिती

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शहरी नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी जनसुरक्षा कायदा आणल्याचा सरकारचा दावा अत्यंत हास्यास्पद आहे. हा कायदा आतून-बाहेरून काळा असून सामान्यांची गळचेपी करणारा आहे. सभागृहात सत्ताधारी पक्षाकडे बहुमत असल्याने त्यांनी बहुमताच्या जोरावर रेटून नेत कायदा मंजूर करून घेतला. सरकारने कायदा मंजूर करून घेतला असला तरी काँग्रेसचा विरोध कायम असून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात या काळ्या कायद्याची होळी केली जाईल,अशी माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी येथे दिली.**



राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात गेल्या आठवड्यात जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आले. विधानसभेत या विधेयकाला काँग्रेसने पाठिंबा दिला तर विधानपरिषदेत विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी जनसुरक्षा कायद्याला काँग्रेसचा विरोध असल्याचे स्पष्ट केले. जनसुरक्षा कायद्यामागचा हेतूच मुळात काळा आहे.या कायद्याचा फायदा फक्त सरकार आणि सरकारधार्जिणे उद्योगपती यांनाच होणार आहे. धारावीचा भूखंड गिळंकृत करणारे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागडचे खनिज संपत्ती लाटणारे आणि शक्तिपीठ मार्गाचा रेड कार्पेट ज्यांना हवा आहे त्या उद्योगपतींना त्याचा फायदा होणार आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.जनसुरक्षा कायद्याला विरोध करणारे गडचिरोलीतील पर्यावरणवादी, आदिवासी, धारावीतील लोक, शक्तिपीठाला विरोध करणारे शेतकरी यांनी मात्र विरोध केला तर त्यांना तुरुंगात टाकले जाणार आहे, त्यांची संपत्ती जप्त केली जाणार आहे. सरकारचे फक्त कौतुक करा नाहीतर गप्प बसा आणि विरोधात बोलाल तर जनसुरक्षा कायद्याचा बडगा उभारून तुम्हाला गप्प करू हाच यामागचा हेतू असल्याची टीकाही त्यांनी केली.संविधानाचा विचार मांडणे, शिव- शाहू- फुले -आंबेडकरांचा विचार मांडणे. महात्मा गांधी, तुकडोजी महाराज यांचा विचार मांडणे हा नक्षलवाद आहे का? याचा खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावा. हा जर नक्षलवादी विचार असेल तर तो मी मांडत राहणार. मला अटक करायची तर फडणवीस यांनी खुशाल करावी, असे आव्हानही सपकाळ यांनी दिले.राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात गेल्या आठवड्यात जनसुरक्षा विधेयक मंजूर करण्यात आले. विधानसभेत या विधेयकाला काँग्रेसने पाठिंबा दिला तर विधानपरिषदेत विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर आज पत्रकार परिषदेत बोलताना सपकाळ यांनी जनसुरक्षा कायद्याला काँग्रेसचा विरोध असल्याचे स्पष्ट केले. जनसुरक्षा कायद्यामागचा हेतूच मुळात काळा आहे.या कायद्याचा फायदा फक्त सरकार आणि सरकारधार्जिणे उद्योगपती यांनाच होणार आहे. धारावीचा भूखंड गिळंकृत करणारे, गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागडचे खनिज संपत्ती लाटणारे आणि शक्तिपीठ मार्गाचा रेड कार्पेट ज्यांना हवा आहे त्या उद्योगपतींना त्याचा फायदा होणार आहे, असा आरोप सपकाळ यांनी केला.जनसुरक्षा कायद्याला विरोध करणारे गडचिरोलीतील पर्यावरणवादी, आदिवासी, धारावीतील लोक, शक्तिपीठाला विरोध करणारे शेतकरी यांनी मात्र विरोध केला तर त्यांना तुरुंगात टाकले जाणार आहे, त्यांची संपत्ती जप्त केली जाणार आहे.

### कौतुक करा नाहीतर गप्प बसा

सरकारचे फक्त कौतुक करा नाहीतर गप्प बसा आणि विरोधात बोलाल तर जनसुरक्षा कायद्याचा बडगा उभारून तुम्हाला गप्प करू हाच यामागचा हेतू असल्याची टीकाही त्यांनी केली. संविधानाचा विचार मांडणे, शिव- शाहू- फुले -आंबेडकरांचा विचार मांडणे. महात्मा गांधी, तुकडोजी महाराज यांचा विचार मांडणे हा नक्षलवाद आहे का? याचा खुलासा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावा. हा जर नक्षलवादी विचार असेल तर तो मी मांडत राहणार. मला अटक करायची तर फडणवीस यांनी खुशाल करावी, असे आव्हानही सपकाळ यांनी दिले.शहरी नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी जनसुरक्षा कायदा आणल्याचा सरकारचा दावा अत्यंत हास्यास्पद आहे. हा कायदा आतून-बाहेरून काळा असून सामान्यांची गळचेपी करणारा आहे.

# फडणवीस पावले नाहीतर कारागृहात असता

## आता तरी बदला, जयकुमार गोरेंचा रामराजेंवर हल्लाबोल

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**त्यांना देवेंद्र फडणवीस पावले. नाहीतर आता कारागृहात गेला असता. आता तरी बदला, नीट वागा, असे म्हणत जयकुमार गोरे यांनी रामराजे नाईक निंबाळकर यांच्यावर जोरदार टीका केली. फलटण येथील मेळाव्यात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे बोलत होते. असत्य, कट-कारस्थानाचा आनंद तात्पुरता असतो. शकुनी मामांनी कट-कारस्थानातून दुर्योधनाच्या अंताचा असुरी आनंद घेतला**



तशाच प्रकारचा असुरी आनंद जयकुमार गोरे, रणजितसिंह निंबाळकर, तसेच गाळेधारकांवर अन्याय करत असताना ते घेत होते. मात्र, त्यांनी रचलेला डाव आता त्यांच्यावरच उलटला आहे. स्वतःला वाचवण्यासाठी कोणा-कोणाचे पाय त्यांनी धरले आहेत हे मला माहिती असल्याचे जयकुमार गोरे म्हणाले.परमेश्वराच्या रूपाने आपणाला देवेंद्र फडणवीस पावले. मी माफ केलं म्हणून कारागृहात बसायचे वाचलात, त्याची जाणीव ठेवा. आता तरी बदला, नीट वागा, चुकीचे वागलात तर ते तुम्हालाच फेडावे लागणार आहे, हेही ध्यानात ठेवा, अशी टीका गोरे यांनी रामराजेंवर केली.कट-कारस्थान जास्त दिवस टिकत नाही. हा आनंद जास्त दिवस नसतो, तात्पुरता असतो. माझ्यावर २९ गुन्हे दाखल झाले, तरी मान वाकवली नाही. कोणाच्या दारात कधी गेलो नाही, असे गोरे म्हणाले. रामराजे नाईक निंबाळकर यांनी रचलेला डाव त्यांच्यावरच उलटला आहे. स्वतःला वाचवण्यासाठी कोणा-कोणाचे पाय धरलेत हे मला माहिती असल्याचे गोरे म्हणाले. तुमच्या दारासमोर पोलीस उभा राहिल्याचेदेखील गोरे म्हणाले.आनंद जयकुमार गोरे, रणजितसिंह निंबाळकर, तसेच गाळेधारकांवर अन्याय करत असताना ते घेत होते. मात्र, त्यांनी रचलेला डाव आता त्यांच्यावरच उलटला आहे.

### कोणाच्या दारात कधी गेलो नाही

स्वतःला वाचवण्यासाठी कोणा-कोणाचे पाय त्यांनी धरले आहेत हे मला माहिती असल्याचे जयकुमार गोरे म्हणाले.परमेश्वराच्या रूपाने आपणाला देवेंद्र फडणवीस पावले. मी माफ केलं म्हणून कारागृहात बसायचे वाचलात, त्याची जाणीव ठेवा. आता तरी बदला, नीट वागा, चुकीचे वागलात तर ते तुम्हालाच फेडावे लागणार आहे, हेही ध्यानात ठेवा, अशी टीका गोरे यांनी रामराजेंवर केली. कट-कारस्थान जास्त दिवस टिकत नाही. हा आनंद जास्त दिवस नसतो, तात्पुरता असतो. माझ्यावर २९ गुन्हे दाखल झाले, तरी मान वाकवली नाही. कोणाच्या दारात कधी गेलो नाही, असे गोरे म्हणाले. रामराजे नाईक निंबाळकर यांनी रचलेला डाव त्यांच्यावरच उलटला आहे. स्वतःला वाचवण्यासाठी कोणा-कोणाचे पाय धरलेत हे मला माहिती असल्याचे गोरे म्हणाले. तुमच्या दारासमोर पोलीस उभा राहिल्याचेदेखील गोरे म्हणाले.

# युक्रेनबरोबरचं युद्ध थांबवलं नाही तर!

## ट्रम्प यांची रशियाला धमकी? 50 दिवसांचा दिला अल्टिमेटम





।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून आजपर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये आयातशुल्कासह बेकायदेशीर स्थलांतरितांच्या मुद्द्यांसह आदी अनेक मोठ्या निर्णयांचा सहभाग आहे. या निर्णयामुळे जगातील अनेक देशांना मोठा फटका बसला आहे. काही दिवसांपूर्वी दक्षिण कोरिया आणि जपानवर टॅरिफ अर्थात आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर लगेचच जगभरातील वेगवेगळ्या आणखी १२ देशांवर नव्याने टॅरिफ लागू करण्याची घोषणा केली होती.**

एवढंच नाही तर डोनाल्ड ट्रम्प यांनी BRICS देशांना देखील अमेरिकाविरोधी भूमिका घेतल्यास मोठ्या आर्थिक भुर्दंडाचा इशारा दिला होता. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट रशियाला धमकीवजा इशारा दिला आहे. जर व्लादिमीर पुतिन यांनी पुढील ५० दिवसांत युक्रेनबरोबरील युद्धबंदी करण्यास सहमती दर्शवली नाही तर रशियाविरुद्ध कठोर टॅरिफ लागू करण्यात येईल, अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितलं की, “युक्रेनबरोबरील युद्धबंदी करण्यास रशियाने सहमती दर्शवली नाही आणि ५० दिवसांत आमचा करार झाला नाही तर आम्ही रशियावर दुय्यम कर लादणार आहोत आणि मग ते १०० टक्के टॅरिफ असेल”, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. तसेच युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाबाबत ट्रम्प.यांनी पुतिन यांच्यावर नाराजी व्यक्त केली आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी ब्रिक्स देशांना देखील मोठा इशारा दिला होता. जो कोणता देश ब्रिक्सच्या अमेरिकाविरोधी धोरणांबरोबर जाईल, त्या देशांवर १० टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादलं जाईल, तसेच या धोरणाला कोणताही देश अपवाद असणार नाही, अशी इशारावजा धमकीच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. या संदर्भात ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर एक पोस्ट देखील शेअर केली होती.एवढंच नाही तर डोनाल्ड ट्रम्प यांनी BRICS देशांना देखील अमेरिकाविरोधी भूमिका घेतल्यास मोठ्या आर्थिक भुर्दंडाचा इशारा दिला होता. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट रशियाला धमकीवजा इशारा दिला आहे. जर व्लादिमीर पुतिन यांनी पुढील ५० दिवसांत युक्रेनबरोबरील युद्धबंदी करण्यास सहमती दर्शवली नाही तर रशियाविरुद्ध कठोर टॅरिफ लागू करण्यात येईल, अशी धमकी डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी बोलताना सांगितलं की, “युक्रेनबरोबरील युद्धबंदी करण्यास रशियाने सहमती दर्शवली नाही आणि ५० दिवसांत आमचा करार झाला नाही तर आम्ही रशियावर दुय्यम कर लादणार आहोत आणि मग ते १०० टक्के टॅरिफ असेल”, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. तसेच युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाबाबत ट्रम्प.यांनी पुतिन यांच्यावर नाराजी व्यक्त केली आहे.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी ब्रिक्स देशांना देखील मोठा इशारा दिला

### ट्रम्प यांनी अनेक मोठे निर्णय घेतले

होता. जो कोणता देश ब्रिक्सच्या अमेरिकाविरोधी धोरणांबरोबर जाईल, त्या देशांवर १० टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादलं जाईल, तसेच या धोरणाला कोणताही देश अपवाद असणार नाही, अशी इशारावजा धमकीच डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली होती. या संदर्भात ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर एक पोस्ट देखील शेअर केली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्ष पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून आजपर्यंत अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये आयातशुल्कासह बेकायदेशीर स्थलांतरितांच्या मुद्द्यांसह आदी अनेक मोठ्या निर्णयांचा सहभाग आहे. या निर्णयामुळे जगातील अनेक देशांना मोठा फटका बसला आहे. काही दिवसांपूर्वी दक्षिण कोरिया आणि जपानवर टॅरिफ अर्थात आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला होता.

# पत्नीने केली पतीची ‘दृश्यम’ स्टाईल हत्या

## मृतदेह घरातच पुरला आणि नवरा केरळला गेल्याचा रचला बनाव





।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**आसाममधल्या गुवाहाटी येथे राहणाऱ्या महिलेने तिच्या नवऱ्याची हत्या केली. त्यानंतर त्याचा मृतदेह घरात पाच फूट खड्डा खणून पुरला. रहिमा खातून असं या महिलेचं नाव आहे. तिने सबियाल रहमानचा म्हणजेच तिच्या पतीचा खून केला. पोलिसांनी ही माहिती दिली आहे. या दोघांच्या लग्नाला १५ वर्षे झाली आहेत. या दोघांमध्ये खटके उडत होते. रहिमाने तिच्या पतीची हत्या केली.**

२६ जूनला गुवाहाटीच्या ज्योमती नगर भागातल्या पांडू परिसरात ही घटना घडली. त्यानंतर रहिमाने तिच्या नवऱ्याचा मृतदेह पाच फूट घरातच खड्डा करुन पुरला. नवरा बेपत्ता झाला आहे तो कुठे गेला हा प्रश्न विचारला जाईल हे रहिमाला माहीत होतं. त्यावेळी रहिमाने तिचा पती केरळला गेला आहे असा बनाव रचला. मात्र ती बरेच दिवस लोकांना एवढंच सांगत होती की पती रहमान केरळला गेला आहे. नंतर काही दिवसांनी तिने तिचं घर सोडलं आणि रुग्णालयात जाते आहे असं सांगून ती घरातून निघून गेली होती. त्यामुळे रहिमा खातूनवरचा संशय वाढला. त्यानंतर रहमानच्या भावाने १२ जुलै रोजी रहमान बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. ज्यानंतर तपासाची सगळी चक्रं हलली आणि घटना उघडकीस आली. एनडीटीव्हीने हे वृत्त दिलं आहे. १३ जुलैला रहिमा खातून पतीच्या हत्येच्या प्रकरणात पोलिसांसमोर हजर झाली. तिची कसून चौकशी केल्यानंतर तिने हत्येची आणि मृतदेह पुरल्याची कबुली दिली.पोलीस उपाधीक्षक पद्मनाव बरुआ म्हणाले, पोलीस ठाण्यात रहिमा आली आणि तिने सांगितलं की २६ जूनला दोघांमध्ये जोरदार भांडण झालं. त्यानंतर मृतदेह घरातच पुरला होता. रहिमाने तिच्या पतीला जी मारहाण केली त्यात त्याला बऱ्याच जखमा झाल्या होत्या. तो गतप्राण झाल्याचं लक्षात आल्याने रहिमा घाबरली. त्यानंतर तिने घरात पाच फुटांचा खड्डा खणला आणि त्यात रहमानचा मृतदेह पुरला.

### पद्मनाव बरुआंनी काय सांगितलं?

आणि तो केरळला गेला आहे याचा बनाव रचला.पोलिसांनी जी चौकशी केली त्यावेळी रहिमा घाबरली. त्यानंतर तिने खड्डा खणून मृतदेह पुरल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्यानंतर तिला घरी नेलं. फॉरेन्सिक टीमला घेऊन पोलीस गेले होते. तो खड्डा पुन्हा खणण्यात आला, तिच्या पतीचा मृतदेह सापडला. पोलिसांचं म्हणणं आहे की एकट्या महिलेने खड्डा खणून मृतदेह पुरणं शक्य नाही. या प्रकरणात आणखी कुणी गुंतलं आहे का? याचाही शोध पोलिसांनी सुरु केला आहे. २६ जूनला गुवाहाटीच्या ज्योमती नगर भागातल्या पांडू परिसरात ही घटना घडली. त्यानंतर रहिमाने तिच्या नवऱ्याचा मृतदेह पाच फूट घरातच खड्डा करुन पुरला. नवरा बेपत्ता झाला आहे तो कुठे गेला हा प्रश्न विचारला जाईल हे रहिमाला माहीत होतं. त्यावेळी रहिमाने तिचा पती केरळला गेला आहे असा बनाव रचला.

# 'मुंज्या' चित्रपटाची बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई

सुपरहिट 'स्त्री' चित्रपट निर्मात्यांनी पुन्हा एकदा प्रेक्षकांसाठी हॉरर-कॉमेडी चित्रपट आणला आहे. अभिनेत्री शर्वरी वाघ, अभय वर्मा, मोना सिंह आणि सत्यराज अभिनीत 'मुंज्या' चित्रपट ७ प्रदर्शित झाला आहे. आदित्य सरपोतदार दिग्दर्शित 'मुंज्या' चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. चित्रपटाची कथा आणि वीएफएक्सने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यामुळे बॉक्स ऑफिसवर चित्रपटाची जोरदार कमाई सुरू आहे.'मुंज्या' चित्रपटाचं कौतुक प्रेक्षकांसह समीक्षकांनी केलं असून एमआयडीबीवर चित्रपटाला १० पैकी ७.२ रेटिंग देण्यात आलं आहे. एकाबाजूला सर्वकाही सुरळीत चालताना दिसत असलं तरी दुसऱ्याबाजूला चित्रपटाला स्क्रीन्स कमी मिळत आहे. पण ज्या प्रकारे चित्रपट दिवसेंदिवस आधिकाधिक कमाई करत आहे, तर स्क्रीन्सचेही प्रमाण वाढले अशी शक्यता वर्तवली गेली आहे. 'मुंज्या' चित्रपटाने आतापर्यंत किती कमाई केली? जाणून घ्या... सध्या बॉक्स ऑफिसवर 'मुंज्या' चित्रपटाला टक्कर देण्यासारखा कुठलाही चित्रपट नाहीये. याचाच फायदा 'मुंज्या'ला झाला आहे. प्रदर्शनानंतरच्या पहिल्याच दिवशी चित्रपटाने ४ कोटी २१ लाख रुपयांचा व्यवसाय केला आहे. समीक्षकांनी अंदाज लावला होता की, 'मुंज्या' चित्रपट पहिल्या दिवशी १.५ ते २ कोटींचा गल्ला जमवेल. पण याच्या दुप्पट कमाई चित्रपटाने केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी चित्रपटाच्या व्यवसायात आणखी मोठी वाढ झाली आहे.

# कोणीच पाठिंबा न दिल्याने कंगना भडकली

लोकसभा निवडणुकीत हिमाचल प्रदेशमधील मंडी मतदारसंघातून विजयी झालेल्या नवनिर्वाचित खासदार व अभिनेत्री कंगना रणौत यांना चंदीगढ विमानतळावर एका महिला सुरक्षारक्षकाना थोबाडीत लगावली. मारहाण सीआयएसएफ महिला सुरक्षारक्षक कुलविंदर कौरला निलंबित करण्यात आलं आहे. मारहाण झाल्याप्रकरणी सिनेइंडस्ट्रीतील कोणीही प्रतिक्रिया दिलेली नाही, यावर कंगना यांनी नाराजी व्यक्त करत सेलिब्रिटींनी सुनावलं आहे. कंगना रणौत यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी बॉलीवूडमधील सेलिब्रिटींनी कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही. काही दिवसांपूर्वी 'ऑल आईज ऑन राफाह' ही पोस्ट अनेकांनी शेअर केली होती. त्या पोस्टचा उल्लेख करत कंगना यांनी सेलिब्रिटींवर टीका केली आहे. त्यांनी इन्स्टाग्रामवर केलेली पहिली पोस्ट डिलीट केली आणि नंतर दुसरी पोस्ट केली. त्यांच्या या दोन्ही पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.कंगना यांनी पहिल्या पोस्टमध्ये लिहिलं होतं, पूर्ण मौन बाळगून आहात. पण लक्षात ठेवा, उद्या तुम्ही आपल्या देशात किंवा जगात कुठेही रस्त्यावर फिरत असाल, तेव्हा काही इस्रायली/पॅलेस्टिनी तुमच्यावर किंवा तुमच्या मुलावर हल्ला करतील, तेही फक्त याचसाठी की तुम्ही सर्वजण राफाहच्या समर्थनार्थ उभे होता होतात, त्यावेळी तुम्ही पाहाल की मी तुमच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी लढेन... जर एखाद्या दिवशी तुम्हाला वाटेल मी का आणि मी कुठे आहे, तर लक्षात ठेवा तुम्ही मी नाहीत.

# शरयू आणि पूर्वा पुन्हा एकदा थिरकल्या


'पारू' या मालिकेने अगदी थोड्या वेळातंच प्रेक्षकांचं मन जिंकलं. पारूची भूमिका साकारणारी शरयू सोनावणे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलीय. शरयू सोशल मीडियावर कायम सक्रिय असते. चाहत्यांबरोबर संपर्कात राहण्यासाठी शरयू मालिकेच्या सेटवरील धमाल मस्ती सोशल मीडियाद्वारे शेअर करत असते.या मालिकेत दिशा हे खलनायिकेचं पात्र साकारणारी पूर्वा शिंदेबरोबर शरयू अनेकदा डान्स रील्स बनवत असते. अलीकडेच "ए कंचन" या ट्रेंडिंग गाण्यावर दोघी थिरकल्या होत्या. तर दोघींनी प्रसादबरोबर 'पुष्पा-२'च्या "अंगारो सा" या गाण्यावरदेखील हूकस्टेप करत डान्स केला होता. तो अजूनही सोशल मीडियावर व्हायरल होतोय. पुष्पा चित्रपटातील 'अंगारो' हे गाणं नुकतंच प्रदर्शित झालं. या गाण्याच्या हूकस्टेपने सध्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलंय. गाणं रीलिज झाल्यानंतर अनेक कलाकारांनी ही हूकस्टेप करत सोशल मीडियावर रिल्स शेअर करायला सुरुवात केलीय.अशातच दोघी पुन्हा एकदा याच गाण्यावर थिरकल्या आहेत. या डान्सचा व्हिडीओ पूर्वाने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केला आहे. हे गाणं रीलिज झाल्यापासून ट्रेंडिंग आहे. सोशल मीडिया इंफ्लूएन्सर्स ते कलाकार या गाण्यावर थिरकताना दिसतायत. दोघींचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होताना दिसतोय. अगदी काही वेळातच या व्हिडीओला तीन हजारांपेक्षा जास्त व्यूज मिळाले आहेत. दोघींच्या मनमोहक अदांनी चाहत्यांना भुरळ पाडली आहे. शरयू आणि पूर्वाचा हा डान्स व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होतोय.



# वय न लपवण्याबद्दल समीरा म्हणाली

बॉलीवूड अभिनेत्री समीरा रेड्डी हिने सिनेइंडस्ट्रीतील तिचे अनुभव सांगितले आहेत. करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना तिच्या शरीरात बदल करण्यासाठी इंडस्ट्रीकडून आलेल्या दबावाबद्दल तिने भाष्य केलं. तिला अनेक प्रसंगी अनेक फिल्टर्स लावण्यास सांगितलं गेलं, पण या दबावाला न जुमानता आपण काम केलं असं समीराने नमूद केलं.'हिंदुस्तान टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत समीरा म्हणाली, "माझ्या करिअरमध्ये यशाच्या शिखरावर असताना मी सर्जरी करून माझे स्तन मोठे करून घ्यावे, यासाठी माझ्यावर किती दबाव टाकला गेला हे मी सांगू शकत नाही. बरेच लोक म्हणायचे, 'समीरा, सगळे करत आहेत, मग तू का नाही?' पण मला माझ्या आत असं काही नको होतं. हे आपले असे दोष लपवण्यासारखं झालं जे मुळात दोष नाहीच. ज्यांना प्लास्टिक सर्जरी आणि बोटॉक्स करायचं आहे त्यांना मी नावं ठेवणार नाही, पण मी ते करणार नाही."समीरा बऱ्याचदा आपलं वय जाहीरपणे सांगते आणि यासाठी चाहते तिचं कौतुकही करतात. गुगलने समीराचं वय चुकीचं दिलं होतं, पण तिने ते दुरुस्त करून घेतल्याचं सांगितलं. "लोक म्हणतात की मी आता अधिक आनंदी आणि अधिक कंफर्टेबल दिसत आहे. मी २८ वर्षांची असताना सुंदर दिसत होते, पण ४५ व्या वर्षी एक कंफर्ट आला आहे. मी ४० वर्षांची असताना इंटरनेट माझं वय ३८ वर्षे दाखवत होतं. पण मला ४० वर्षांची असल्याचा अभिमान होता म्हणून मी लगेचच ते बदलून घेतलं," असं समीरा म्हणाली.सुरुवातीला समीरा जेव्हा सोशल मीडियावर आली, तेव्हा तिला अनेकांनी फिल्टर वापरण्याचा सल्ला दिला होता. "मी म्हणाले की मी माझी त्वचा खराब असेल तर मी ती तशीच दाखवेन, मी माझं वाढलेलं वजन दाखवेन. कारण हीच मी आहे. ३६-२४-३६ या बॉडी साइजमध्ये फिट होण्याचा प्रयत्न करण्याऐवजी मी जे केलं, त्याबद्दल जास्त आनंदी आहे. मी खऱ्या आयुष्यात जशी आहे, तशीच मी सोशल मीडियावर वावरले. चित्रपटांमध्ये काम करताना मी हे कधीच करू शकले नव्हते."समीरा पुढे म्हणाली, "माझ्या आणि माझ्या प्रेक्षकांमध्ये नेहमीच एक पडदा होता.

# ट्विंकलने अनेक पुस्तकं लिहिली



एकेकाळची लोकप्रिय अभिनेत्री व प्रसिद्ध लेखिका ट्विंकल खन्ना हिने आता तिच्या आयुष्यातील एक मनोरंजक किस्सा सांगितला आहे. हा किस्सा तिची मुलगी निताराशी संबंधित आहे. मुलगी निताराच्या रंगावर एका नातेवाईकाने टिप्पणी केली होती, असं ट्विंकलने तिच्या ब्लॉगमध्ये सांगितलं आहे. नातेवाईकाच्या त्या टिप्पणीनंतर निताराला पोहणं शिकायचं नव्हतं आणि अचानक तिला भाऊ आरवसारखं गोरं दिसायचं होतं, असं ट्विंकल म्हणाली. 'द टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये लिहिलेल्या ब्लॉगमध्ये ट्विंकल म्हणाली, "एक वेळ अशी होती जेव्हा माझ्या लहान मुलीला पोहणं शिकणं थांबवायचं होतं. कारण तिची त्वचा काळवंडली होती. 'मला दादासारखाच रंग हवा आहे.' असं ती म्हणत होती. त्यामागचं कारण म्हणजे एका मूर्ख नातेवाईकाने केलेली टिप्पणी तिने ऐकली होती. 'ती खूप गोंडस आहे पण तिच्या भावासारखी गोरी नाही,' असं त्या नातेवाईकाने म्हटलं होतं."या प्रसंगानंतर आपण मुलीला फ्रिडा काहलोचं यांचं आत्मचरित्र वाचायला दिलं, असं ट्विंकलने सांगितलं. फ्रिडा या खूप गोऱ्या नव्हत्या, त्यांच्या दोन्ही भुवया आपसात जोडलेल्या होत्या, पण त्या प्रचंड हुशार होत्या. या पुस्तकामुळे चिमुकल्या निताराचे दिसण्याविषयीचे, रंगाविषयीचे तिचे विचार बदलले. आता ती म्हणते की तिला भावाइतकं सनब्लॉकर वापरावं लागत नाही, कारण तो गोरा आहे, त्यामुळे त्याला त्याच्या त्वचेची जास्त काळजी घ्यावी लागते. पांढरा रंग लवकर घाण होतो, पण तपकिरी व गडद रंग लवकर घाण होत नाहीत, असं नितारा म्हणते. ट्विंकलने सांगितलं की तिला वाचनाची सवय तिचे वडील राजेश खन्ना यांनी लावली होती. तेही खूप पुस्तकं वाचायचे. माझ्या मुलीला पुस्तकं वाचायला शिकवणं सोपं नव्हतं. ट्विंकलने तिला पुस्तक वाचण्याची सवय लावण्यासाठी एक मनोरंजक उपाय शोधला. ट्विंकल निताराबरोबर पुस्तक वाचण्याची स्पर्धा करते. जेव्हा ट्विंकल म्हणते की ती पुस्तक वाचण्यात पुढे आहे, तेव्हा नितारा आणखी वेगाने वाचू लागते.२००१ मध्ये अक्षय कुमारसोबत लग्न केल्यानंतर ट्विंकल खन्नाने अभिनय सोडला कारण तिला अभिनय करून आनंद मिळत नव्हता. तिला पुस्तकांची खूप आवड आहे आणि तिने अभिनय सोडल्यावर याच क्षेत्रात करिअर केलं. ट्विंकलने 'वेलकम टू पॅराडाईज' आणि 'पायजामा फॉरगिव्हिंग' यासह अनेक पुस्तकं लिहिली आहेत.

# जडेजा- सिराजची झुंज अपयशी!

## सायनाने इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर सर्वांनाच धक्का दिला

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसऱ्या सामन्याचा थरार लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यातील पहिल्या डावात इंग्लंडने ३८७ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला देखील ३८७ धावा करता आल्या. त्यामुळे दुसरा डाव शून्यापासून सुरू झाला. इंग्लंडचा दुसरा डाव १९२ धावांवर आटोपला. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी १९३ धावांची गरज आहे.**



इंग्लंडने लॉर्ड्स कसोटी जिंकण्यासाठी भारतीय संघासमोर १९३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघाला चौथ्या दिवसाच्या सुरुवातीलाच ४ मोठे धक्के बसले. चौथ्या दिवशी फलंदाजी करताना यशस्वी जैस्वाल शून्यावर माघारी परतला. तर करूण नायर १४, शुबमन गिल अवघ्या ६ धावांवर माघारी परतला. नाइट वॉचमन म्हणून फलंदाजीला आलेला आकाशदीप १ धाव करत माघारी परतला. पाचव्या दिवशी भारतीय संघ धावांचा पाठलाग करून ऐतिहासिक विजय मिळवण्याच्या प्रयत्नात असणार आहे.पाचव्या दिवसाच्या सुरुवातीला ऋषभ पंतने काही आकर्षक फटके मारले. पण जोफ्रा आर्चरने टाकलेला चेंडू टप्पा पडून आत आला आणि ऋषभ पंतची दांडी गुल करून गेला.ऋषभ पंत ९ धावांवर माघारी परतला आहे. या डावात फलंदाजी करताना केएल राहुलवर मोठी जबाबदारी होती. कारण तो सावध होऊन फलंदाजी करत होता. पण बेन स्टोक्सने टाकलेला चेंडू आत आला आणि केएल राहुलला पायचित करून गेला. केएल राहुलला ३९ धावांवर माघारी परतावं लागलं आहे. त्यानंतर फलंदाजीला आलेला वॉशिंग्टन सुंदर शून्यावर बाद होऊन माघारी परतला आहे. भारतीय संघाला पाचव्या दिवशी झटपट ४ मोठे धक्के बसले. पण रवींद्र जडेजा आणि जसप्रीत बुमराहने मिळून भारतीय संघाचा डाव सावरला आहे. भारतीय संघाला आता विजयासाठी ४८ धावांची गरज आहे.भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा खंबीरपणे उभा राहिला आहे. त्याने आपलं अर्धशतक पूर्ण केलं आहे. भारताचे ९ फलंदाज माघारी परतले आहे. सिराज आणि जडेजाची जोडी मैदानावर आहे. भारताला जिंकण्यासाठी ३४ धावांची गरज आहे.या सामन्यात भारतीय संघ विजयाच्या अगदी जवळ पोहोचला होता. पण शेवटी मोहम्मद सिराज बाद होऊन माघारी परतल्यामुळे भारतीय संघाला हा सामना २२ धावांनी गमवावा लागला आहे. लॉर्ड्सला क्रिकेटची पंढरी असं म्हणतात. त्यामुळे या मैदानावर सामना जिंकणं हे कुठल्याही संघासाठी अतिशय खास असतं. आता कपिल देव, कोहलीनंतर युवा कर्णधार शुबमन गिलकडेही या खास क्षण अनुभवायची संधी चालून आली आहे. पण लॉर्ड्सचा निकाल भारतीय संघाच्या बाजूने लागणार का? हे पाहणं देखील तितकंच महत्वाचं असणार आहे. या मैदानावर आतापर्यंत ७ वेळेस १९० पेक्षा अधिक धावांचा यशस्वी पाठलाग केला गेला आहे. या रेकॉर्डमध्ये भारतीय संघाचं नाव नाही. भारताने १९८६ मध्ये १३६ धावांचा यशस्वी पाठलाग केला होता. यासह २०१४ मध्ये २०२१ मध्ये मिळवलेला विजय हा भारतीय संघाने धावांचा बचाव करताना मिळवला होता.

### 22 धावांनी गमवावा लागला सामना

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या ५ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तिसरा कसोटी सामना लॉर्ड्सच्या मैदानावर सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडने भारतीय संघासमोर विजयासाठी १९३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला चौथ्या दिवसाच्या शेवटी फलंदाजीला यावं लागलं. चौथ्या दिवसाचा खेळ संपायला अवघे काही मिनिटे शिल्लक असताना आकाशदीप नाईट वॉचमन म्हणून फलंदाजीला आला. गिल बाद झाल्यानंतर ऋषभने फलंदाजीला यायला हवं होतं. पण आकाशदीप फलंदाजी करण्यासाठी आला. हा निर्णय शेवटच्या क्षणी घेण्यात आला. दरम्यान भारताचा माजी गोलंदाज आर अश्विनने, ऋषभ पंतला शेवटच्या क्षणी फलंदाजी करायला का आवडत नाही, याबाबत खुलासा केला आहे.आकाशदीप ज्यावेळी फलंदाजी करण्यासाठी आला, त्यावेळी तो फलंदाजीसाठी पूर्णपणे तयार नव्हता. हे आकाशदीप ज्या पद्धतीने मैदानात आला, त्यावरून स्पष्ट दिसत होतं.

# कुणाच्या डोक्यावर पराभवाचं खापर?

## या पराभवानंतर काय म्हणाला कर्णधार शुबमन गिल?

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये सुरू असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला आहे. यजमान इंग्लंडने आपला गड राखत लॉर्ड्सच्या मैदानावर २२ धावांनी विजय मिळवला. या विजयासह इंग्लंडने या मालिकेत २-१ ने आघाडी घेतली आहे. या सामन्यातील शेवटच्या दिवशी एकटा जडेजा शेवटपर्यंत लढला. पण त्याला इतर फलंदाजांकडून साथ मिळाली नाही.**



दरम्यान सामन्यानंतर कर्णधार शुबमन गिलने पराभवाचं नेमकं कारण सांगितलं आहे. या सामन्यानंतर बोलताना शुबमन गिल म्हणाला,

" मला माझ्या संघाचा अभिमान वाटतो. शेवटच्या सत्रात आमच्या फलंदाजांनी कडवी झुंज दिली. ही खरी कसोटी क्रिकेटची मजा आहे.

पाचव्या दिवशी सकाळच्या सत्रात आम्हाला भागीदारीची गरज होती. इंग्लंडचा संघ आमच्यापेक्षा वरचढ होता. आमच्या आघाडीच्या फळीतील फलंदाजांकडून भागीदारीची गरज होती. पण तसं झालं नाही.चौथ्या दिवसातील शेवटचा एक तास आणि पाचव्या दिवसातील सुरुवातीचा एक तास आमच्यासाठी जड गेला.तरीदेखील आम्ही या सामन्यात संघर्ष केला.

"भारतीय संघाला सुरुवातीला मोठे धक्के बसले होते. संघातील मुख्य फलंदाज स्वस्तात माघारी परतले होते. अशा स्थितीत जडेजा फलंदाजीलाआला आणि त्याने शेवटपर्यंत एक बाजू धरून ठेवली. जडेजाने सिराज आणि बुमराहसोबत मिळून सामना जिंकण्यासाठी पूर्ण जोर लावला.

### आकाशदीप स्वस्तात माघारी परतला

पण भारताला शेवटी नशिबाची साथ मिळाली नाही. दरम्यान ६१ धावांवर नाबाद राहिलेल्या जडेजाबद्दल बोलताना गिल म्हणाला, "जडेजाकडे खूप अनुभव आहे. त्यामुळे त्याला काही विशेष सांगण्याची गरज नव्हती. तो अप्रतिम फलंदाजी करत होता, मी फक्त त्याला आणि खालच्या फळीला टिकून राहायला सांगितलं."या सामन्यात भारतीय संघाला विजयासाठी १९३ धावा करायच्या होत्यायशस्वी जैस्वाल, करूण नायर, शुबमन गिल आणि नाईट वॉचमन म्हणून आलेला आकाशदीप स्वस्तात माघारी परतला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज ™

ePaper

। मंगळवार ।
। दि. 18 मार्च 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# राष्ट्रवादीतर्फे गाथा सन्मानाची-कर्तृत्ववान महिलांचा गुणगौरव!

## जागतिक महिला दिनानिमित्त शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन राष्ट्रवादी महिला काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर अध्यक्षा प्रा कविता आल्हाट यांच्या वतीने "गाथा सन्मानाची" या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये आपले अमूल्य योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.**



सदर सन्मान सोहळा गोदावरी आंगण, बोऱ्हाडे वाडी, मोशी येथे पार पडला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी केले. या कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाला चालना देणाऱ्या आणि समाजहितासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा विशेष सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या, विशेषतः परिचारिका, शिक्षिका, ब्युटीशियन, पोलीस कॉन्स्टेबल, तसेच इतर विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना शहर अध्यक्ष कविता आल्हाट यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.महिलांसाठी विविध खेळांचे, कलागुणांचे प्रदर्शन चे आयोजन करण्यात आले होते.

### महिलांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न...

राष्ट्रवादी काँग्रेस महिला सेलच्या प्रदेश अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदद पवार, प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या "गाथा सन्मानाची" या उपक्रमाद्वारे महिलांना प्रेरणा देण्याचा आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

# 'निर्भय कन्या' अभियानामधून
# महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय - डॉ. किर्ती धारवाडकर

## शिक्षण विश्व: एसबीपीआयएम मध्ये निर्भय कन्या अभियान संपन्न

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थिनींचा आणि समाजातील वंचित घटकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी निर्भय कन्या अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले पाहिजे. यामुळे महिलांचे मनोबल आणि आत्मविश्वास वाढेल. त्यातून त्यांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्या सक्षम नागरिक म्हणून काम करतील, हाच निर्भय कन्या अभियानाचा मुख्य उद्देश आहे असे एसबीपीआयएमच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या वतीने एसबीपीआयएम येथे "निर्भय कन्या अभियान" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी वरिष्ठ संबंध व्यवस्थापक दिपाली महाजन, सह प्रा.डॉ.काजल माहेश्वरी,डॉ.रूपाली कुदरे आदी उपस्थित होते.

पहिल्या सत्रात 'इंट्रोडक्शन टू द वर्ल्ड ऑफ इन्व्हेस्टमेंट- एक गुंतवणूकदार जागरूकता उपक्रम' या विषयावर दिपाली महाजन यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, व्यवस्थापक, व्यवस्थापकीय बँकिंग आणि राष्ट्रीय वितरण वाहिनीचा अवलंब करून विद्यार्थिनींना जीवनात स्वतंत्रता, वेळेची बचत आणि गुंतवणूक करून करिअर मध्ये स्थिरता कशी आणता येते. विद्यार्थ्यांना पैशांचे व्यवस्थापन आणि विविध आर्थिक साधनांमधील गुंतवणुकीचे महत्त्व सांगितले.

दुसऱ्या सत्रात डॉ. काजल माहेश्वरी यांनी 'वैयक्तिक सुरक्षा' या विषयावर मार्गदर्शन केले. वैयक्तिक सुरक्षा वाढविण्यासाठी लागणारी धोरणे, स्व-संरक्षण तंत्र आणि संभाव्य धोक्यांची जाणीव विद्यार्थिनींना करून दिली. कोणत्याही परिस्थितींमध्ये सुरक्षित राहण्यासाठी काळजी कशी घ्यावी याची उदाहरणे दिली.

समारोप प्रसंगी डॉ. रूपाली कुदरे यांनी 'मानसिक आरोग्य व्यवस्थापन' या विषयावर मानसिक आरोग्य व्यवस्थापनाचे महत्त्व, तणाव व्यवस्थापन तंत्र, जागरूकता, सकारात्मक विचार, स्वत:ची काळजी घेण्याच्या धोरणांवर मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्याच्या आव्हानांना ओळखण्याच्या आणि त्यांचा सामना करण्याच्या पद्धती समजून सांगितल्या. प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी वक्त्यांना गुंतवणूक धोरणे,वैयक्तिक सुरक्षा उपाय आणि मानसिक आरोग्य व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्न विचारले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उत्कृष्ट कार्यक्रम राबविल्याबद्दल आयोजकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


मोरया शिक्षण संस्था
Computer Vacation Batch
ADMISSIONS OPEN
2025-26
'C' भाषा ₹ १३००/-
'C++' भाषा ₹ १३००/-
बेसिक जावा ₹ १३००/-
स्क्रॅच ॲनिमेशन ₹ १३००/-
बेसिक टॅली ₹ १५००/-
एम.एस. ऑफिस ₹ १५००/-
कोरल ड्रॉ ₹ ११००/-
Adobe AB फोटोशॉप ₹ ११००/-
सर्व कोर्स 20 मार्च 2025 पासून सुरू होत आहेत. इच्छुक पालक, विद्यार्थी व इतर शाळेतील विद्यार्थ्यांनी खालील नंबरवर संपर्क करून प्रवेश निश्चित करावा. अथवा शाळेतील संगणक कक्षात येऊन अधिक माहिती घ्यावी.
ठिकाण: संगणक लॅब, व्ही. के. माटे हायस्कूल, चिंचवड. संपर्क : 8087706100

# रंग आणि लेखणीतून जगभरातील घडामोडींवर भाष्य!

## शिक्षण विश्व: पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या अंतर महाविद्यालयीन स्पर्धेला प्रतिसाद

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धा मधून विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीवर भाष्य केले. जगभरातील विविध घडामोडी विद्यार्थ्यांनी रंग आणि लेखणीतून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून दिल्याबद्दल विद्यार्थी आणि पालकांकडून या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करण्यात आले .**




पिंपरी चिंचवड कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, रावेत आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन पोस्टर मेकिंग, निबंध लेखन आणि वक्तृत्व स्पर्धांचा बक्षी वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत पुणे व पिंपरी चिंचवड मधील विविध महाविद्यालयांतील ११० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पारितोषिक वितरण समारंभाला उपस्थित पाहुणे डॉ. आबासाहेब शिंदे, प्राचार्य डॉ. स्मृती पाठक, कार्यक्रम समन्वयक प्रा. देवेंद्र देसाई, प्रा. सुप्रिया कुलकर्णी आणि एस. बी. पाटील सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रावेतचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

पोस्टर स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सुवर्णा शिंदे, अश्विनी साळवे, निबंध लेखन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. शेळके, प्रा. अमृता दीक्षित आणि वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रा. स्वाती पाटील, प्रा. रोहित वरवंडकर यांनी काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. इशप्रीत कौर, सूत्रसंचालन प्रा. देवेंद्र देसाई व आभार प्रा. सुषमा पिंपळखरे यांनी मानले.

विजेत्यां विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, रोख बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि भारतीय रेड क्रॉस सोसायटी, पुणे जिल्हा शाखेचे सहकार्य मिळाले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# पीएचडी मार्गदर्शकांकडून होताहेत गैरव्यवहार!

## आमदार शंकर जगताप: विधानसभेत राज्य सरकारचे लक्ष वेधले!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.**



आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला. पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले. या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

